I/o प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** भाग्य नगर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0319 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/08/2020 18:53 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 01/08/2020
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/08/2020
   **Time From (वेळेपासून):** 12:15 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/08/2020 **Time (वेळ):** 17:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 033 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/08/2020 18:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कॅनलरोड लगत बजाज गलेक्सी समोर,नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उमेश दिगंबरराव गिरी चांडोळकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कैलासनगर नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कैलासनगर नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7588066888

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री उदयकुमार लक्ष्मणराव मिसाळ | | | 1. सावित्रीबाई फुले नगर नांदेड ,भाग्य नगर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री राहुल प्रल्हादराव परांडे | | | 1. सावित्रीबाई फुले नगर नांदेड,भाग्य नगर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

पो.स्टे. भाग्यनगर गु.र.न. 319/2020 कलम 7, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 1) फिर्यादी -उमेश दिगंबरराव गिरी (चांडोळकर), वय 40 वर्ष , व्यवसाय - व्यापार रा. कैलासनगर नांदेड ता.. जि. नांदेड . मो.नं 75880668882) आरोपी-1) श्री उदयकुमार लक्ष्मणराव मिसाळे, वय 47 वर्ष , तलाठी सज्जा चांडोळा मुखेड, राहणार सावित्रीबाई फुले नगर नांदेड. मुळ रा समतानगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड.2) श्री राहुल प्रल्हादराव परांडे, वय 46 वर्शे, व्यवसाय मजुरी रा. गौतमनगर किल्ला रोड नांदेड3) गुन्हा घडला तारीख . वेळ, ठिकाण - दिनांक 01/08/2020 रोजी 12.15 वाजताचे सुमारास.नांदेड शहरातील कॅनलरोड लगत बजाज गलेक्सी समोर 4) लाचेची रक्कम30000/-रूपये 5) दाखल करणार-पोउपि- आर.सी .जाधव पो.स्टे भाग्यनगर नांदेड.6) खुलासा:-सादर विनंती की वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्याण यातील नमुद आरोपी लोकसेवक क्र-1 श्री उदयकुमार लक्ष्मणराव मिसाळे पद तलाठी यांनी यातील तक्रारदार/फिर्यादी यांचे मयत वडील श्री दिगांबर नारायणराव गिरी(चांडोळकर) यांचे नावावरील मौजे चांडोळा ता. मुखेड जि.नांदेड येथे 1 एकर 38. आर वारसाहक्काने तक्रारदार व त्यांचे भाऊ श्री रमेशचंद्र तसेच बहिण सौ.सुलोचना दिगंबरराव गिरी (माहेरचे नाव) यांचे नावावर 7/12 फेरफार करणेसाठी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 30,000/- रूपये लाचेची मागणी केली व सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र-1 यांनी आरोपी क्रमांक -2 श्री राहुल प्रल्हादराव परांडे यांचे मार्फतीने लाचेची रक्कम 30,000/- स्विकारली वगैरे मजुराचे फिर्याद वरुन मा. पो. नि सा यांचेआदेशाने वर प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपास कामी मा. पो. नि राहुल पखाले सा ला.प्र.वि. नांदेड यांचे कडे देण्यात आला .

दि. 1.8.2020 फिर्याद मी उमेश दिगंबरराव गिरी (चांडोळकर), वय 40 वर्शे, व्यवसाय - व्यापार रा. कैलास नगर नांदेड ता.. जि. नांदेड . मो. नं 7588066888समक्ष पोलीस स्टेषन भाग्यनगर येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन मी दिनांक 29/07/2020 रोजी पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचे कार्यालयात जावून तक्रार दिली होती की, माझे मयत वडील श्री दिगांबर नारायणराव गिरी(चांडोळकर) यांचे नावावरील मौजे चांडोळा ता. मुखेड जि.नांदेड येथे 1 एकर 38. आर वारसा हक्काने माझ्या व माझे भाऊ श्री रमेशचंद्र तसेच बहिण सौ.सुलोचना दिगंबरराव गिरी (माहेरचे नाव) यांचे नावावर 7/12 वर फेरफार करण्यासाठी मौजे चांडोळा गावचे तलाठी मिसाळे हे 40,000/- रूपये लाच मागत असल्याबाबत तक्रार दिली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री राहुल पखाले यांनी शासकीय तत्रनिकेतन नांदेड येथील 1) श्री मोहित मारोतराव मेश्राम पद- अधिव्याख्याता 2) श्री.राहुल दिलीप गेडेकर, पद- अधिव्याख्याता या दोन षासकीय पंचाची सेवा उपलब्ध करून घेतले त्यानंतर माझी व दोन्ही पंचाची, सर्व सापळा पथकाची एकमेकांना ओळख करून दिली.

त्यानंतर दिनांक 31/07/2020 रोजी पोनि श्री पखाले साहेब, माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत केले त्यानंतर लाचमागणी पडताळणीचे वेळ व ठिकाण निश्चित करण्यासाठी माझे मोबाईल क्रमांक 7588066888 वरून तलाठी मिसाळे यांचे मोबाईल क्र 9637545456 वर फोन करून वारसाचं प्रमाणपत्रासाठी लागणारे सगळे कागद आणले असे सांगितले असता तलाठी मिसाळे यांनी मी मुखेडला आहे सायंकाळी भेटूत असे म्हणुन फोन कट केला. सदरचे संभाशण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी परत माझे मोबाईलवरून तलाठी मिसाळे यांचे मोबाईलवर कॉल केला असता तलाठी मिसाळे यांनी मी आता सोमठाण्याला आहे बघा, उदया दहा वाजता भेटू असे म्हणुन फोन कट केला. सदरचे संभाषण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. त्यावेळी पोनि श्री राहुल पखाले साहेब यांनी सदरची कार्यवाही दिनांक 01/08/2020 रोजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दिनांक 01/08/2020 रोजी सकाळी माझे मोबाईल क्रमांकावरून तलाठी मिसाळे यांना कॉल केला असता तलाठी मिसाळे यांनी कॉल उचलला नाही त्यानंतर काही वेळात तलाठी यांचा माझे मोबाईलवर कॉल आला व तलाठी मिसाळे यांनी मला नांदेड शहरातील कनॉल रोडलगत बजाज गलक्सीजवळ येण्यास सांगितले सदरचे संभषण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर माझेजवळ डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर देवून मला माझे मोटारसायकलने व माझे सोबत पंच क्रमांक -1 मोहित मेश्राम यांना त्यांचे मोटारसायकलने तलाठी मिसाळे यांची भेट घेण्यासाठी बजाज गलक्सीजवळ लाचमागणी पडताळणी करणे करीता पाठविले. मी व पंच क्र-1 मेश्राम असे बजाज गलक्सीजवळ गेलोत सदर ठिकाणी मी तलाठी मिसाळे यांची भेट घेतली त्यावेळी पंच क्रमांक-1 मेश्राम हे आमचे पासुन काही अंतरावर आमचे बोलणे ऐकत थांबुन राहीले मी माझे कडील 7/12 फेरसाठी लागणारे कागदपत्रे तलाठी मिसाळ यांना दिले व माझे कामा बाबत बोलणे झाले. तेव्हा तलाठी मिसाळ यांनी तुम्हाला अगदी व्यवस्थित सांगितलो, असे म्हणाले तेव्हा मी त्यांना अहो साहेब चाळीस हजार रूपये लई व्हायलेत साहेब, आम्ही गोसावी माणसे आम्हाला थोड मदत करा, काहीतरी व्यवस्थित घ्या अन करून दया मला, चाळीस हजार रूपये लई होता साहेब, काहीतरी कमी करा तुमच्या हातात आहे तुम्हीच सांगा मदत केल्यासारख तेव्हा तलाठी यांनी पाच कमी द्या असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना तीस हजार रूपये घेवून टाका असे म्हणाले त्यावेळी तलाठी यांनी दोन तीन काम करावे लागतात पस्तीस पर्यंत, हजार दोन हजार कमी केल तर होते त्यावेळी मी हजार दोन हजार कमी केल्यावर तेहतीस हजार व्हायलेत आता तीन हजार रूपयासाठी तुम्ही का एवढं हे करायले असे म्हणालो त्यावेळी तलाठी यांनी मला हे करून टाका म्हणजे मला पुढे घेवून जाता येते, केव्हा करता? असे विचारले त्यावेळी मी पैशाच का? विचारले त्यावेळी तलाठी यांनी हो असे म्हणाले तेव्हा मी पैशाचं एक-दोन घंटयात जोड करून देतो तुम्हाला असे म्हणालो त्यावेळी तलाठी मिसाळे यांनी बर ऐका त्यावेळी मी आहे जावू दया हो साहेब दोन हजार रूपये काम झाल्यावर देतो वाटल्यास अन् तीस हजार रूपये आता देतो असे म्हणालो त्यावेळी तलाठी मिसाळे यांनी चालते असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना कुठे येवू मग? अषी विचारणा केली असता त्यांनी कॉल करा की असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच क्र-1 मोहित मेश्राम असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयात परत येवून पोनि श्री राहुल पखाले यांना घडलेली सर्व हकीकत सांगितली. तेव्हा पोनि पखाले यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले सर्व संभाशण ऐकले तेव्हा मौजे चांडोळा ता. मुखेड गावचे तलाठी मिसाळे यांनी माझे मयत वडील श्री दिगांबर नारायणराव गिरी(चांडोळकर) यांचे नावावरील मौजे चांडोळा ता. मुखेड जि.नांदेड येथे 1 एकर 38. आर वारसाहक्काने माझ्या व माझे भाऊ श्री रमेषचंद्र तसेच बहिण सौ.सुलोचना दिगंबरराव गिरी यांचे नावावर 7/12 वर फेरफार करण्यासाठी तडजोडीअंती 30,000/- रूपयांची मागणी केली असल्याचे निषप्ण झाले. त्यावेळी मी माझेकडील 500/- रू दराच्या 60 नोटा असे एकुण 30,000/- रूपये पोलीस निरीक्षक श्री राहुल पखाले यांचे कडे दिले त्योवळी पोनि श्री पखाले साहेबांनी सापळा कार्यवाही लावण्याचा निर्णय घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयात त्यांचे कक्षात सापळा पुर्व कार्यवाही पुर्ण केली. त्यानंतर सापळा कार्यवाहीचे ठिकाण निषप्ण करणेसाठी व तलाठी मिसाळे यांनी फोन लावण्यास सांगितल्याने पोनि पखाले यांचे सुचनेवरून माझे मोबाईलवरून तलाठी मिसाळे यांचे मोबाईलवर फोन लावला असता व तलाठी मिसाळे यांना पैशाची व्यवस्था झाल्याचे सांगितले तेव्हा तलाठी मिसाळे यांनी मला पुर्वीच्या ठिकाणी बजाज गलक्सी येथेच येण्यास सांगितले. तेव्हा अँथ्रासिन पावडरयुक्त 30,000/- रूपये ज्यात 500/- रूपये दराच्या 60 नोटा असलेली रक्कम माझे पन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवली व मला लाचस्विकृती झाल्यानंतर गळ्यातील रूमाल काढुण उजव्या हातामध्ये धरावे असा लाचस्विकृतीचा इशारा नेमुण दिला. त्यानंतर माझेकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर देवून मला माझे मोटार सायकलने व सोबत पंच क्रमांक-1 मोहित मेश्राम यांना त्यांचे मोटार सायकलने नियोजीत ठिकाणी बजाज गलक्सी येथे रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि श्री राहुल पखाले साहेब, सर्व सापळा पथक असे मोटार सायकलने सापळा कार्यवाही करणेसाठी बजाज गलक्सी येथे गेलोत सदर ठिकाणी तलाठी श्री मिसाळे हे थांबलेले होते मी माझी मोटार सायकल त्यांचे जवळ थांबविली माझे पाठोपाठ पंच क्र-1 मोहित मेश्राम हे माझे जवळ येवून थांबले त्यानंतर तलाठी मिसाळे यांना माझे वारसाहक्काने 7/12 फेरफार करणे संबधीचे बोलणे झाले मी माझे काम तात्काळ करून देणेस विनंती केली त्यावेळी तलाठी मिसाळे यांनी पाच-सात तारेखपर्यंत हे होवून जाईल, बघु शक्यतो लवकरात लवकर करून असे म्हणाले मी माझे पन्टच्या खिशातील लाचेची रक्कम काढुण हे बघा म्हणत तलाठी मिसाळे यांचेसमारे धरली तेव्हा त्यांनी इशा-याने बाजुला थांबलेल्या व्यक्तीकडे देण्यास सांगितले तेव्हा सदर व्यक्तीने हात पुढे केले तेव्हा मी त्यांना तुमच्याकडे देवू असे विचारले असता त्या व्यक्तीने हा असे म्हणत लाचेची रक्कम स्विकारली तेव्हा मी तलाठी मिसाळे यांना मोजून घ्या असे म्हणालो तेव्हा तलाठी मिसाळे यांनी मोजायची काय गरज आहे एटीएम मधुन काढले असाल त्याला काय व्हायलं त्यांना मोजुन घ्या असे म्हणाले त्यावेळी सदर व्यक्तीने लाचेची रक्कम मोजुन त्याचे पन्टच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवली त्यावेळी मी माझे गळ्यातील मोठी दस्ती काढुण उजव्या हातामध्ये धरून लाचस्विकृतीचा इषारा दिला तेव्हा सर्व सापळा पथक सदर ठिकाणी आले त्यावेळी माझेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला त्यावेळी मी त्यांना घडलेली सर्व हकीकत सांगितली सदर ठिकाणी पोनि श्री पखाले यांनी यशस्वी सापळ्याची प्राथमिक कार्यवाही केली व त्यानंतर तलाठी मिसाळे व त्यांचेसोबतच्या व्यक्ती, मी, पोनि पखाले, दोन्ही पंच व सर्व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयात आलोत. सदर ठिकाणी पोनि श्री पखाले यांनी उर्वरित सापळा कार्यवाहीचे कामकाज केले. एकंदरित माझे दिनांक 29/07/2020 रोजीचे तक्रारीच्या अनुषंगाने आज दिनांक 01/08/2020 रोजी शासकीय पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाहीत आरोपी लोकसेवक तलाठी मिसाळे यांनी माझे मयत वडील श्री दिगांबर नारायणराव गिरी(चांडोळकर) यांचे नावावरील मौजे चांडोळा ता. मुखेड जि.नांदेड येथे 1 एकर 38. आर वारसाहक्काने माझ्या व माझे भाऊ श्री रमेशचंद्र तसेच बहिण सौ.सुलोचना दिगंबरराव गिरी (माहेरचे नाव) यांचे नावावर 7/12 फेरफार करणेसाठी तडजोडीअंती 30,000/- रूपये लाचेची मागणी करून त्यांचा मित्र राहुल प्रल्हादराव परांडे यांचे मार्फतीने आज दिनांक 01/08/2020 रोजी 12.15 वाजताचे सुमारास नांदेड शहरातील कनॉल रोडवरील बजाज गलक्सी समोर स्विकारून शासकीय पदाचा गैरवापर करून स्वतःचा आर्थीक फायदा करून घेतला म्हणुन माझी 1) श्री उदयकुमार लक्ष्मणराव मिसाळे, वय 47 वर्शे, तलाठी सज्जा चांडोळा मुखेड, राहणार सावित्रीबाई फुले नगर नांदेड. 2) श्री राहुल प्रल्हादराव परांडे, वय 46 वर्शे, व्यवसाय मजुरी रा. गौतमनगर किल्ला रोड नांदेड यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये योग्य ती कायदेशिर कार्यवाही होणेस विनंती आहे. माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर नोंदविल्यानंतर प्रिंट काढली सदर तक्रार मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ही फिर्याद दिली सही/SD ( उमेश दिगंबरराव गिरी (चांडोळकर)) रा.कैलास नगर नांदेड ता.जि.नांदेड

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): abhimanyu baliram solunke(I (Inspector)) / pobn52846 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.भाग्यनगर,नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): abhimanyu baliram solunke
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pobn52846

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)